**प्रेस नोट दिनांक २२/०५/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**चोरीस गेलेल्या ज्युपिटर गाडीचा गाडीचा तात्काळ शोध घेवून मालकास परत.**

---------------------------------||||||||||------------------------------------

दि. २१.०५.२०१९ रोजी मुलगा नामे निखील नवकिशोर अजमेरा रा. शाहुकॉलनी, शेवाळे पार्क पुणे याने फडगेट पोलीस चौकीस येवून कळविले की, तो क्लाससाठी प्रेस्टीज पॉइंटयेथे आला होता त्यावेळी त्याचेकडील टी.व्ही.एस. कपंनीची ज्युपिटर मोपेड गाडी क्र. एम.एच.३०.ए.क्यु.७९५४ ही प्रेस्टीज पॉइंट येथे लॉक करून पार्क केली होती. तक्रारदार मुलगा निखील अजमेरा याचा क्लास ०७.०० वाजता संपल्यानंतर तो बाहेर आला असता त्याची वरील वर्णनाची ज्युपिटर गाडी दिसुन आली नाही म्हणुन त्याने सदर गाडीचा इतरत्र शोध घेतला असता मिळुन न आल्याने तक्रार देण्यासाठी आलो असल्याचे सांगितले.

सदर वेळी चौकी अंमलदार पोलीस हवालदार ५५६९ क्षीरसागर यांनी फडगेट मार्शलवरील कर्मचारी यांना बोलावुन घेवून गाडीचे वर्णन देवून गाडीचा चौकी हद्दीत शोध घेणेबाबत सांगितले. सदरवेळी बीट मार्शलवरील कर्मचारी पोशि तावरे व पोशि केंद्रे यांनी चौकी हद्दीमध्ये शोध घेत असताना तक्रारदार यांची वर्णनाप्रमाणे ज्युपिटर गाडी बेवारस स्थितीत पार्क केलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने सदरची गाडी ताब्यात घेवून नमुद कर्मचारी यांना फडगेट चौकीस आणुन तक्रारदार यांना दाखविली. सदरवेळी तक्रारदार यांचेकडील कागदपत्रांची पडताळणी करून खात्री करून सदरची गाडी तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

ता. २२/०५/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

